१० व्या नाशिक आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवास अर्थसहाय्य मंजूर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्रमांक : आंचिम-२०१८/प्र.क्र.१९/सां.का.१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २० मार्च, २०१८

वाचा : १) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र.आंचिम-२०११/ प्र.क्र.१५८/ सां.का.१, दि.१८.१०.२०१२.
२) संचालक सांस्कृतिक कार्य संचालनालय यांचे पत्र क्र. सां.का.सं./७६४, दि.१६.०२.२०१८.

शासन निर्णय :

शासन निर्णय दि. १८.१०.२०१२ अन्वये आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे आयोजन करणाऱ्या संस्थांना अर्थसहाय्य देण्याबाबतचे धोरण घोषित करण्यात आले आहे. या धोरणास अनुलक्षून मेट्रो फाऊंडेशन ऑफ इंडिया व कलावैभव संस्था, नाशिक या संस्थांनी १० व्या नाशिक आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी शासनातर्फे रु.५.०० लक्ष अनुदानाच्या ८० टक्के च्या मर्यादेत रु.४.०० लक्ष (**रुपये चार लक्ष**) इतके अर्थसहाय्य खालील अटींच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

१. मंजूर केलेले अर्थसहाय्य हे मुंबई वित्तीय नियमानुसार अनुज्ञेय राहील.
२. मंजुर केलेले अनुदान हे अनावर्ती असेल व शासनाच्या नेहमीच्या अर्थसहाय्यासंदर्भातील अटी व शर्ती यांच्या अधिन राहून असेल.
३. अर्थसहाय्याचा विनियोग केवळ मंजूर केलेल्या प्रयोजनार्थ व तात्काळ करण्यात यावा. तसे न केल्यास अर्थसहाय्याची रक्कम बँकेच्या प्रचलित व्याज दरासह शासनास परत करणे बंधनकारक राहील.
४. चित्रपट महोत्सवाच्या समारोपानंतर किमान ३ महिन्यात उपयोगिता प्रमाणपत्र, जमाखर्चाचा तपशिल (Profit and Loss Account) व खर्चाचा ताळेबंद (Balance Sheet) सादर करणे बंधनकारक राहील.
५. चित्रपट महोत्सवात प्रदान करण्यात येणाऱ्या पुरस्कार/सन्मान समितीवर शासनाचा किमान एक प्रतिनिधी संस्थेने नेमणे आवश्यक राहील.
६. चित्रपट महोत्सवाची जाहिरात, निमंत्रणपत्रिका इ.माध्यमातून “सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या सहकार्याने” असा ठळक उल्लेख करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासनाचा सहयोग महोत्सवाशी संबंधित सर्वांना तसेच प्रसार माध्यमांना देखील स्पष्टपणे समजेल, अशा पद्धतीने आयोजकांनी महोत्सवपूर्व व महोत्सवादरम्यान विशेषत्वाने अधोरेखित करावा.
७. आयोजक संस्थेला शासन निर्णय दि.१८.१०.२०१२ अन्वये घोषित धोरणातील सर्व अटी व शर्तींची पूर्तता करणे बंधनकारक राहील.
८. वरील सर्व नियमातील बदल, सुधारणा किंवा अर्थ लावणे याबाबतचे पूर्ण अधिकार शासनास राहतील व याबाबत शासनाने दिलेले आदेश अंतिम व संबंधितांवर बंधनकारक राहतील. तसेच याबाबत करारावर स्वाक्षरी करणाऱ्या दोन्ही पक्षात वाद झाल्यास वादाचे

निराकरण करण्याकरीता सचिव (पर्यटन व सांस्कृतिक कार्य) यांचा लवाद नेमण्यात येऊन त्यांनी दिलेला निर्णय अंतिम तसेच दोन्ही पक्षांवर बंधनकारक राहील. तथापि, लवाद नेमल्यास कोणत्याही पक्षास न्यायालयात जाण्याची मुभा नाही. वरील अटी शर्तीसह करार करण्यासाठी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

२. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांना यासाठी नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांनी प्राधिकृत केलेल्या दुय्यम अधिकाऱ्यास या संबंधीच्या देयकावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. यासाठी होणारा खर्च " मागणी क्रमांक झेडडी-२, २२०५ कला व संस्कृती (००) १०२, कला संस्कृती प्रचालन (०३)कला व संस्कृति प्रचालन(०३) (०६) आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव (२२०५ १५८१), ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) " या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या उपलब्ध तरतुदीतून भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.०६.०२.२०१८ मधील अटींची पूर्तता होत असल्याची खात्री करुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१८०३२०११४९५१४५२३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shubha Sandeep Borkar

Digitally signed by Shubha Sandeep Borkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tourism and Cultural Affairs Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a5aad2ffd1ca24b4f170e08cb89f8c5afe63bdfb3a3342e87a3a382491c19344, serialNumber=89652983d1b1fed6adbe42c0c9c3eaad80206ff6fe79f81e3557a9fc8efc766e, cn=Shubha Sandeep Borkar
Date: 2018.03.21 11:49:01 +05'30'

(शुभा बोरकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा/विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई.
४. सर्व सन्माननीय विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य.
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-एक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. महालेखापाल (लेखापरीक्षा)-एक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
९. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
१०.वित्त विभाग, (व्यय १४), अर्थसंकल्प ११.
११.मा.मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव.

१२.अवर सचिव (अर्थसंकल्प) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई. - (यांना उक्त अनुदानाची रक्कम BDS व्दारे उपलब्ध करुन देण्यासंदर्भातील कार्यवाहीसाठी अग्रेषित)

१३.अध्यक्षा, मेट्रो फाऊंडेशन ऑफ इंडिया व कलावैभव संस्था, ए-१, रामबाग सी.एच.एस-२, गंगापूर रोड, नाशिक-४२२ ०१३

१४.निवड नस्ती - सां.का.१.